जा.क्र/पो.आ./L33980/२०२४
पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड
यांचे कार्यालय दि.29/०३/२०२४

प्रतिबंधात्मक आदेश

विषय :- फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४(१) नुसार जगतगुरु श्री. संत तुकाराम महाराज बीज सोहळा अनुषंगाने प्रतिबंधात्मक आदेश.

संदर्भ :- १) जा.क्र.देहुरोड पो.स्टे./७९३९३०/२४ दिनांक-०५/०३/२०२४ अन्वये...
२) आ.क्र.वि.शा./८२११९५/९३/२०२४ दिनांक- १४/०३/२०२४ अन्वये...

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातील देहुरोड पोलीस स्टेशन हद्दीतील देहुगाव येथे जगतगुरु श्री. संत तुकाराम महाराज बीज सोहळा सालाबाद प्रमाणे दिनांक-२७/०३/२०२४ रोजी संपन्न होणार आहे.

दरवर्षी संपन्न होणा-या तुकाराम बीज सोहळा करीता दोन ते तीन लाख भाविक संपुर्ण महाराष्ट्र व परराज्यातुन देहूगाव येथे दर्शनसाठी येत असतात. तसेच जगतगुरु श्री. संत तुकाराम महाराज बीज सोहळ्यासाठी देहुगांव येथे लाखो भाविक मंदिर व मंदिर परिसरात एकाच ठिकाणी एकवटलेले असतात. बीज सोहळ्या दरम्यान संत तुकाराम महाराज मंदिर व मंदिर परिसरात फळे-फुले विक्रेते, खेळणी विक्रेते व इतर लोक आपली हातगाडी लावून तसेच फिरुन व जागा अडवून विक्री करत असतात, त्यामुळे बीज सोहळ्या करिता आलेल्या भाविक (वारकरी) यांना अडथळा निर्माण होतो. गर्दीचा फायदा घेवून गुन्हेगार प्रवृतीचे लोक देखील आपला हेतु साध्य करतात. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवुन अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जगतगुरु श्री. संत तुकाराम महाराज बीज सोहळ्याचे अनुषंगाने दिनांक-२६/०३/२०२४ रोजी ००.०० ते दिनांक-२७/०३/२०२४ रोजी २४.०० वा. पर्यंतच्या कालावधीत श्री. संत तुकाराम महाराज मंदिर परिसर , वैकुंठ मंदिर परिसर, देहुगाव मुख्य कमान ते १४ टाळकरी कमान या भागात फुल, फळ, खेळणी विक्रेते हे हातगाड्या लावुन जमीनीवर बसुन तसेच फिरुन त्यांचा माल विक्री करतात. रस्त्याचे दोन्ही बाजुला त्यांचे बसण्यामुळे रस्त्याची रुंदी लहान होवुन रस्त्यावरुन पायी जाणा-या भाविक (वारकरी ) यांना पथारी वाल्यांचा त्रास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी होवुन चेंगराचेंगरी होण्याची शक्यता नाकारता येत नाही .

त्याअर्थी, मी विनय कुमार चौबे पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४(१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार आदेश जारी करीत आहे.

पुणे जिल्ह्यातील देहुगाव येथील श्री. संत तुकाराम महाराज मंदिर परिसर , वैकुंठ मंदिर परिसर, देहुगाव मुख्य कमान ते १४ टाळकरी कमान या रस्त्यावर तसेच मुख्य मंदिर समोरील रस्ता ते १४ टाळकरी कमान ते वैकुंठ मंदिर रोड, भैरवनाथ चौक या परिसरात दिनांक-२६/०३/२०२४ रोजी ००.०० ते दिनांक-२७/०३/२०२४ रोजी २४.०० वा. पर्यंत सुरक्षा आणि कायदा व सुव्यवस्थेच्या कारणास्तव फेरीवाले, पथारीवाले, पानटप-या यांना बसण्यास व फिरण्यास प्रतिबंधात्मक आदेश लागु करण्यात येत आहे.

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहीती प्रसारमाध्यमे, पोलीस स्टेशन, सहा.पोलीस आयुक्त, परिमंडळीय पोलीस उपायुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

CamScanner

सदरचा आदेश दिनांक-२९/०३/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला आहे.

तारीख- २९ /०३/२०२४
ठिकाण- पिंपरी चिंचवड

पोलीस आयुक्त पिंपरी-चिंचवड

(विनय कुमार चौबे)
पोलीस आयुक्त
पिंपरी चिंचवड

प्रति,

१) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग.

२) मा.जिल्हाधिकारी, पुणे.

३) मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका.

४) मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

५) सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक महाराष्ट्र राज्य.

६) उप विभागीय प्रांत अधिकारी, खेड व हवेली.

७) तहसिलदार, खेड व हवेली.

८) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, २ व ३

९) सर्व सपोआ, पिंपरी चिंचवड. सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पिंपरी चिंचवड.

CamScanner